## निशाण १७ खाली आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज फिर्यादीतर्फे कलम ९१ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दाखल करण्यात आला आहे.

२. फिर्यादीचे थोडक्यात असे कथन आहे की, फिर्यादीने दाखल केलेला खटला हा खोटे दस्तावेज व फसवणुकीबाबतचा आहे. या संबंधीचे आणखी काही कागदपत्रे नगर परिषद कार्यालय, मुरुम यांच्या ताब्यात असून ते दस्ताऐवज पुराव्याच्या कामी बोलाविणे अंत्यत आवश्यक आहे. सदरील खटला हा त्या दस्ताऐवजावर अवलंबून असल्याने सदरील अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्र यादीमधील कागदपत्रे मागविण्याची विनंती केली आहे.

३. फिर्यादी कल्लीनाथ शिवयोगी ढंगे यांचा युक्तीवाद सविस्तरपणे ऐकला.

४. फिर्यादी यांचा नि.क्र. १८ कडील लेखी युक्तीवादाचे सविस्तरणे अवलोकन केले. फिर्यादीने तोंडी युक्तीवादामध्ये प्रस्तुत अर्जातील मागणीमधील नि.क्र. १७/१ चे लिस्टापोटी दाखल केलेल्या कागदपत्रामधील माहिती नगर परिषद, मुरुम यांना नियमाप्रमाणे देता आली नाही तर नगर परिषद, मुरुम यांना घरजागा क्र. ११२२, ११२२/१, ११२२/१/२ व ११२२/२ चे मुळ भोगवटदार व सध्याचे भोगवटदार यांची लेखी स्वरुपात माहिती मागितली आहे.

५. फिर्यादीचे थोडक्यात असे कथन आहे की, फिर्यादी हा मौजे मुरुमचा रहिवासी असून मौजे मुरुम येथे फिर्यादीची वडीलोपार्जित मालकीची घरजागा क्र. ११२३ जिचा मालमत्ता कर क्र. १३०५ क्षेत्र पुर्व–पश्चिम १०७ फुट व दक्षिण–उत्तर ७५ फुट ज्याचे एकुण क्षेत्रफळ ५,०७५ चौरस फुट अशी आहे. सदर घरजागेपैकी आरोपी यांनी गहाणखत दस्त क्र. १८३९/२०१४, गहाणखत दस्त क्र. १५९८/२०१५ अन्वये फिर्यादीची वडीलोपार्जित घरजागा ही स्वतःची मालकीची घरजागा म्हणुन वेगवेगळया बँकेत गहाण ठेवली आहे व फिर्यादी यांची रक्कम रु.२५,००,०००/– इतकी फसवणुक केली आहे व फिर्यादीला स्वतःच्या मालमत्तेपासून वंचित केले आहे. सदर फिर्यादीची घरजागेचे मुळ भोगवटदार संबंधी व सध्याच्या भोगवटदार संबंधी माहिती नगर परिषद मुरुम यांच्याकडे मागितली असता नगर पालिका मुरुम यांनी फिर्यादी यास दि.१८/०२/२०२० रोजी जा.क्र. नपमु/१२०/२०२० अन्वये कागदपत्रे दिले परंतु सदर कागदपत्रावरती नगर परिषद मुरुम यांच्या सक्षम अधिका–याची सही व शिक्का नाही. फिर्यादीने वेळोवेळी नगर परिषद मुरुम यांच्याकडे त्याबाबत मागणी केली असता योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता नगर पालिका मुरुम यांनी केली नाही. मी

अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले. अभिलेखावरुन हे स्पष्टपणे दिसून येते की, फिर्यादी हा जेष्ठ नागरीक असून फिर्यादीने नगर परिषद, मुरुम यांच्याकडे वेळोवेळी तसेच अन्य योग्य त्या सक्षम अधिकारी यांच्याकडे सदर कागदपत्रे मिळणेबाबत मागणी केलेली होती. प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादी यांची कलम २०० फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये जबाब नोंदविण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादी यांच्या फिर्याद कथनानुसार तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता, सदरील कागदपत्रे ही प्रस्तुत प्रकरणामध्ये आवश्यक व गरजेची आहेत. त्यामुळे मी वर नमुद सर्व कारणांचा सारासार विचार करुन खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. मुख्याधिकारी नगर परिषद मुरुम यांना आदेशीत करण्यात येते की, मौजे मुरुम येथील घरजागा क्र. ११२२, ११२२/१, ११२२/१/२, ११२२/२ चे मुळ भोगवटदार व सध्याचे भोगवटदार याबाबतची माहिती या न्यायालयामध्ये नियमाप्रमाणे विहीत नमुन्यामध्ये ३० दिवसामध्ये दाखल करावी.

३. सदर आदेशाप्रमाणे मुख्याधिकारी नगर परिषद मुरुम पत्र काढण्यात यावे.

Digitally signed by ACHYUTRAO DHANAJI PATIL
Date: 2021.11.29 16:30:10 +0530

(ए.डी. पाटील )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
उमरगा

दिनांकः २९/११/२०२१

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Clerk | ---- | A.M. Kurne |
| Court | ---- | J.M.F.C. Omerga Court no.3 |
| Date | ---- | 29/11/2021 |
| Order signed by the Presiding Officer on | ---- | 29/11/2021 |
| Order uploaded on | ---- | 29/11/2021 |